जाहिरातीचा दिनांक : ०१/१२/२०१५
अर्ज स्विकारण्याची अंतीम तारीख: ०८/१२/२०१५

# मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर

# जाहिरात

क्रमांक : एन–०२/९१२/एएसआर/आरए/२०१५ दिनांक : १ डिसेंबर, २०१५.

मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ या आस्थापनेवर शिपाई/हमाल या पदाकरीता ३२ उमेदवारांची निवड यादी व ३२ उमेदवारांची प्रतिक्षा यादी तयार करण्यासाठी निरोगी, इच्छूक, पात्र उमेदवारांकडून ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहे. नियमाप्रमापणे सदर पदाची वेतन श्रेणी रुपये ४४४०–७४४०/– अधिक ग्रेड वेतन रुपये १३००/– अशी आहे. मुंबई उच्च न्यायालय अधिसुचना क्रमांक : नियम/एक्स–२३१९/७१, दिनांक २० नोव्हेंबर, २००९ प्रमाणे २% जागा अपंग व्यक्तींकरीता राखीव ठेवण्यात आलेली आहे (म्हणजेच १% जागा बहिऱ्या व्यक्तींकरीता, तसेच १% जागा एका पायाने अधू व्यक्तींकरीता राखीव ठेवण्यात आलेली आहे. अपंगत्वाचे प्रमाण किमान ४० टक्के असणे आवश्यक आहे.)

पात्रता :–

शैक्षणिक पात्रता :–

१. उमेदवार कमीत कमी ७ वा वर्ग पास असावा.

२. शिपाई पदाला अनुषंगीक व दैनंदिन जिवनाला उपयुक्त अशी कला किंवा विशेष अर्हता असणाऱ्या उमेदवारांना प्राधान्य मिळू शकेल.

३. विशेष अर्हता असणाऱ्या उमेदवारांनी प्रत्यक्ष मुलाखतीचे वेळी त्याबाबत पुरावा म्हणून दाखले हजर करावे. अशी अर्हता असल्याबाबत प्रशासन, मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर कडून पडताळणी करण्यात येईल.

४. उमेदवार जाहिरात प्रसिध्दीच्या तारखेला १८ वर्षा पेक्षा लहान व ३३ वर्षापेक्षा मोठा नसावा. मागासवर्गीयांसाठी कमाल मर्यादा ३८ वर्षाची असेल. महाराष्ट्र शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई क्र.एसआरव्ही १०७७/३५७६/१४४३/१६ए, दिनांक २३ मे १९७८ नुसार शारीरिक दृष्टया अपंग उमेदवारांसाठी (जे अन्यथा शिपाई/हमाल या पदासाठी पात्र आहे) भरतीची कमाल वयोमर्यादा ४५ वर्षापर्यंत शिथिल करण्यात येते.

अर्ज करण्याची पध्दत :—

१) अर्ज सादर करतांना दिलेल्य वेबसाईट (महाऑनलाईन) वरील सुचनांचे काटेकोरपणे पालन करुनच अर्ज सादर करावा.

२) प्रस्तुत परीक्षेसाठी अर्ज फक्त **ऑनलाईन** पध्दतीने स्विकारण्यात येतील. इतर कोणत्याही प्रकारचे अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

३) पात्र उमेदवारांनी ऑनलाईन अर्ज **http://bombayhighcourt.nic.in** या वेबसाईट द्वारे दिनांक ०१/१२/२०१५ ते दिनांक ०८/१२/२०१५, सायंकाळी ५.०० वाजेपर्यत सादर करणे आवश्यक राहील.

४) ऑनलाईन पध्दतीने अर्ज करतांना उमेदवाराने स्वत:च्या अद्यावत पासपोर्ट फोटोची (३.५ से.मी. X ४.५ से.मी.) व स्वत:ची स्वाक्षरी (रुंदी ३ से.मी. X २.५ से.मी.) आणि ४० KB पेक्षा पेक्षा जास्त साईज होणार नाही अशा **jpg/jpeg format** हया विहित पध्दतीने स्कॅन करुन ऑनलाईन अर्जात दर्शविलेल्या ठिकाणी सदर फोटो व स्वाक्षरी अपलोड करणे अनिवार्य आहे. (टिप. फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्याचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेशपत्रावर/अर्जावर दुसऱ्याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास उमेदवारास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिला जाणार नाही.)

५) ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सविस्तर सूचना **http://bombayhighcourt.nic.in** या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

६) उमेदवाराने **http://bombayhighcourt.nic.in** या वेबसाईट वर आपले खाते तयार केलेले नसल्यास उमेदवारास नविन वापरकर्ता नोंदणी वर क्लिक करुन युजर नेम व पासवर्ड तयार करावा लागेल.

७) त्यानंतर उमेदवारास प्रोफाईल निर्मिती मध्ये जाउन स्वत:ची संपूर्ण माहिती भरावी लागेल. या वेबसाईटवर या पूर्वी प्रोफाईल निर्मिती मध्ये जाउन स्वत:ची संपूर्ण माहिती भरलेली असल्यास पुन्हा माहिती भरावयाची आवश्यकता नाही. पण उमेदवार स्वत:च्या प्रोफाईल मधील जुनी माहिती अद्यावत करु शकतो/करावी.

८) उमेदवाराने युजर नेम व पासवर्ड ची नोंद लॉग इन केल्यानंतर अर्ज सादर करावयाच्या कार्यालयाच्या लिंकवर क्लिक करावे. त्या कार्यालयाअंतर्गत उपलब्ध जाहिराती अर्ज करण्यासाठी येथे क्लिक करा या संदेशासह दाखविल्या जातील.

९) क्लिक केल्यानंतर आपण जाहिरातीत नमुद शैक्षणिक पात्रता/अनुभव/इतर बाबीची पूर्तता करत असल्यास आपला अर्ज स्विकारल्या जाईल. अन्यथा अर्ज दाखल न होण्याचे कारण दाखवले जाईल.

१०) परीक्षा प्रवेशपत्र उमेदवारांस **http://bombayhighcourt.nic.in** तसेच **https://bhc.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. पदभरती संदर्भात सविस्तर माहिती, इतर शर्ती व अटी हया **http://bombayhighcourt.nic.in** तसेच **https://bhc.mahaonline.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध राहील. संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली संपूर्ण जाहिरातीमधील सुचनांचे वाचन करुनच अर्ज सादर करावे.

११) परीक्षेच्यावेळी उमेदवाराने प्रवेश प्रमाणपत्र आणणे सक्तीचे आहे. त्याशिवाय परीक्षेस प्रवेश दिला जाणार नाही.

१२) अनुभव प्रमाणपत्र (मोघम नको) संस्थेचा शिक्का व सही तसेच जावक क्रमांक असणे आवश्यक आहे.

१३) शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अर्जात विभाग प्रमुखांनी दिलेल्या परवानगीचा क्रमांक नमुद करणे आवश्यक आहे.

१४) निवडप्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ६० दिवसांच्या कालावधीनंतर प्रश्नपत्रिका व उत्तर पत्रिका नष्ट केल्या जातील.

१५) ऑनलाईन अर्ज करण्याचा शेवटचा दिनाक <u>०८/१२/२०१५</u> राहील. दिलेल्या तारखेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रिया काढून टाकण्यात येईल/बंद करण्यात येईल. अर्ज फक्त ऑनलाईन पध्दतीनेच स्विकारले जातील कार्यालयात प्रत्यक्ष स्वरुपात कोणतेही अर्ज स्विकारण्यात येणार नाही.

१६) अर्ज भरण्यासंबंधी, हॉल टिकीट (परीक्षा प्रवेशपत्र) उपलब्धतेसाठी इ. तत्सम बाबींसाठी वरील संकेतस्थळावर संपर्क करावा.

१७) सदर्हु जाहिरातीमध्ये दर्शविलेल्या पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. जाहिरातीत दिनांक ३१/१२/२०१७ पर्यत सेवानिवृत्तीमूळे रिक्त होणारी पदे दर्शविण्यात आलेली आहे. कोणत्याही कारणास्तव पदे कमी/जास्त झाल्यास निवड केलेल्या उमेदवारास नियुक्तीबाबत हक्क प्रस्थापित करता येणार नाही. तसेच सदर्हु पदे जशी जशी रिक्त होतील त्यानुसार नियुक्ती आदेश निर्गमित करण्यात येतील. निवड झालेल्या उमेदवारांनी पदस्थापनेबाबत/स्थळाबाबत कोणत्याही प्रकारचा दबाव आणल्यास किंवा पदस्थापनेबाबत विनंती केल्यास त्याची निवड रद्द करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.

१८) कोणत्याही कारणास्तव रिक्त पदांच्या संख्येत बदल अथवा भर्ती रद्द झाल्यास याबाबत अर्जदाराला कोणताही दावा सांगता येणार नाही. परीक्षेचा प्रकार, पदांच्या संख्येत बदल करणे, परीक्षा स्थगीत करणे व रद्द करणे, अंशत: बदल करणे, याबाबत सर्व अधिकार प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी स्वत: कडे राखून ठेवले आहे. याबाबत कोणालाही कोणत्याही प्रकारचा दावा सांगता येणार नाही अथवा न्यायालयात दाद मागता येणार नाही.

१९) निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी अर्जदाराने अर्जात दिलेली माहिती खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी नियुक्ती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.

२०) अर्जदार जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या पात्रता व अटी शर्तीनुसार पात्र आहे असे समजून त्याला लेखी परीक्षेकरीता तात्पुरता प्रवेश देण्यात येईल. नियुक्ती पूर्वी उमेदवाराची जाहिरातीनुसार पात्रता तपासण्यात येईल. त्यावेळी उमेदवार अपात्र आढळल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी उमेदवाराची राहील.

<u>उमेदवारांकरीता सुचना :--</u>

१) अर्ज शुल्क चालानद्वारे भरल्याशिवाय अर्जदारांचे अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

२) अर्जदाराने अर्ज करतांना **शुल्क रुपये २५/--** भरायला पाहिजे आणि ते शुल्क परत मिळणार नाही.

३) ज्या अर्जदारांचे नाव अल्प सुची मधे आहे त्यांनी रुपये ५०/-- चालानद्वारे भरणे आवश्यक आहे. सदर शुल्क परत केल्या जाणार नाही.

४) <u>ऑनलाईन चालन भरण्याची पध्दत :--</u>

अ) डाव्याबाजूला वरती दिलेल्या **'my account'** या टॅब वर क्लिक करावे.

ब) **'my account'** या टॅब मधील **'my application'** वर क्लिक करुन **'direct recruitment'** वर क्लिक करावे.

क) ऑनलाईन पेमेंट करण्याकरीता खालील दोन ऑपशनस् उपलब्ध आहेत.

१) **Pay Online**

२) **Pay by challan**

ड) ऑनलाईन या अंतर्गत उमेदवार केडिट कार्ड, डेबिट कार्ड तसेच नेटबॅकींगद्वारे शुल्क जमा करु शकतो.

इ) ऑनलाईन चालान भरण्यासाठी **'Pay by challan'** या बटणावर क्लिक करावे. **'Pay by challan'** या बटणावर क्लिक केल्यानंतर उमेदवाराने सदर चालानचे प्रिंट काढून ते भारतीय स्टेट बॅकेच्या कोणत्याही शाखेत भरावे. (बॅकेमार्फत त्याकरीता रुपये ५०/-- अतिरिक्त शुल्क आकारले जाईल.)

ई) ऑनलाईन अर्ज सादर करण्याच्या दोन तासानंतर उमेदवाराने चालानद्वारे शुक्ल जमा केले पाहिजे आणि कोणत्याही परिस्थितीत चालानद्वारे शुल्क भरण्याच्या शेवटच्या दिनांकापर्यत किंवा पुर्वी शुल्क जमा करणे आवश्यक आहे.

५) ज्या उमेदवारांना मुलाखतीकरीता बोलवण्यात येईल, त्यांनी त्यांनी खालील कागदपत्रांच्या प्रमाणित केलेल्या छायांकित प्रती त्यांच्या मुळ प्रमाणपत्रांसह पडताळणीसाठी मुलाखतीच्या वेळी सोबत आणाव्या.

अ) जन्म तारखेचा दाखला.

आ) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे गुणपत्रक.

इ) शैक्षणिक पात्रतेच्या परिक्षेचे प्रमाणपत्र

ई) उमेदवार अपंग असल्यास, जिल्हा शल्य चिकित्सक/निवासी वैद्यकीय अधिकारी/मुख्य वैद्यकीय अधिकारी/शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अधिक्षक यांनी दिलेला अपंगत्वाचा दाखला.

उ) जाहिरात प्रसिध्दीनंतरची तारीख असलेली दोन प्रतिष्ठित व्यक्तींनी दिलेली चारित्र संपन्नतेविषयीचे प्रमाणपत्रे. (त्यांच्या पत्ता व फोन नंबर सह)

ऊ) पुर्वानुभव असल्यास त्या संबंधीचा दाखला.

ए) जातीचा दाखला (मागासवर्गीयांसाठी)

ऐ) विशेष अर्हता असल्याबाबत दाखला.

ओ) महाराष्ट्राचे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate)

६) जाहिरातीस अनुसरुन प्राप्त झालेल्या अर्जाच्या संख्येनुसार व उमेदवाराच्या शैक्षणिक पात्रता व त्यातील गुणवत्तेनुसार अल्प सुची (Shortlisting) करण्याचे सर्व अधिकार प्रबंधक (प्रशासन), मुंबई उच्च न्यायालय, नागपूर खंडपीठ, नागपूर यांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत. त्यानुसार लेखी परीक्षेसाठी आणि/किंवा निवड प्रक्रियेच्या कुठल्याही टप्प्यावर, पात्र उमेदवारांची निवड करण्यासाठी गुणमर्यादा ठरविली जाईल.

७) केवळ अर्ज दाखल केला यावरुन मुलाखतीचा किंवा नेमणूकीचा हक्क मागता येणार नाही.

८) आलेल्या अर्जाची छाननी केल्यानंतर पात्र उमेदवारांना खालील निवड प्रक्रियेस सामोरे जावे लागेल.

१) लेखी परीक्षा ३० गुण

२) शारीरिक क्षमता व विशेष अर्हता १० गुण

३) तोंडी मुलाखत १० गुण

९) पात्र उमेदवारांना (नेमलेल्या तारखांना) परीक्षांसाठी व तोंडी मुलाखतीसाठी स्व:खर्चाने हजर रहावे लागेल.

१०) अल्पसुचीत पात्र उमेदवारांसाठी लेखी परीक्षा व शारीरिक क्षमता व विशेषा अर्हता चाचणीचे वेळापत्रक मुंबई उच्च न्यायालयाचे संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यात येईल. परिक्षेचे प्रवेश प्रमाणपत्र अर्जदाराने दिलेल्या email address वरच पाठविण्यात येईल. अर्जदाराने प्रवेशप्रमाणपत्र मिळाल्याबद्दलची पोचदेखील फक्त email द्वारेच द्यायची आहे.

११) अर्जदाराने त्याचा अचुक email address अर्जामध्ये भरायचा आहे. चुकीचा email address दिल्यामुळे अर्जदारास प्रवेशप्रमाणपत्र न मिळाल्यास प्रशासन, उच्च न्यायालय त्यास जबाबदार राहणार नाही.

१२) तोंडी मुलाखतीसाठी पात्रता, उमेदवाराने लेखी परीक्षा तसेच शारिरीक क्षमता व विशेष अर्हता चाचणी मध्ये मिळविलेल्या गुणांद्वारे, त्याच्या अर्जाची छाननी केल्यानंतर व त्याने तोंडी मुलाखतीचे वेळेस हजर केलेल्या कागदपत्रांची पडताळणी केल्यानंतरण अंतिमरित्या ठरविण्यात येईल. फक्त पात्र उमेदवारांचीच तोंडी मुलाखत घेण्यात येईल.

१३) उमेदवाराने निवड समितीच्या सदस्यांना किंवा उच्च न्यायालयात काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना /कर्मचाऱ्यांना भेटण्याचा किंवा त्यांच्यावर त्याच्या निवड प्रक्रियेसंबंधी व्यक्तीश: अथवा इतर कोणा मार्फत दबाव आणण्याचा प्रयत्न केल्यास त्याला निवड प्रक्रियेमधून अपात्र ठरविण्यात येईल व यासंबंधी निवड समितीचा निर्णय अंतिम राहील.

१४) उमेदवारांची निवड/भरती त्याने परिक्षांमध्ये व तोंडी मुलाखतीमध्ये मिळविलेल्या गुणांच्या गुणवत्तेनुसारच करण्यात येईल.

नागपूर
दिनांक :

प्रबंधक (प्रशासन),
मुंबई उच्च न्यायालय, नागपूर
खंडपीठ, नागपूर